CMYK

आजचा युवक सरकार बदलू शकतो, अभिजीत दिपके यांचा सरकारला इशारा >>पान 2

राज्यात 'एसआयआर'चे ८७.७९ टक्के काम पूर्ण! >>पान 3

मुल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 4

सुविचार
कोसळलो तरी चालेल, पण तुटू नका.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 15 ■ गुरूवार, दि. 30 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




अभिनेता सोनू सूदने शिर्डीत अनाथ मुलांसोबत साजरा केला वाढदिवस

आतील पान

## स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विकासकामांवर आता एआय आणि 'जीओ टॅगिंगची' नजर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (म हानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा) शासनाच्या निधीतून होणाऱ्या विकासकाम ांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्ता आणण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विकासकामांचे तांत्रिक आणि सामाजिक लेखापरीक्षण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय),जिओ-टॅगिंग आणि जीआयएस मॅपिंग या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

सन २०२६ च्या पावसाळी अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ऑडिट टप्प्याटप्प्याने लागू करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आता नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या आयुक्त तथा संचालकांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. यासंदर्भात आज २९ जुलै २०२६ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे.

अनेकदा नागरी संस्थांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा आणि इतर पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये दर्जाहीन कामे किंवा निधीचा गैरवापर झाल्याच्या तक्रारी येतात. मात्र, आता जिओ-टॅगिंग आणि ए आय सारख्या तंत्रज्ञानामुळे कामाच्या प्रत्येक टप्प्यावर थेट लक्ष ठेवता येणार आहे. यामुळे विकासकाम ांचा दर्जा सुधारेल आणि कामांमध्ये पारदर्शकता निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

असे होणार हायटेक ऑडिट

या नव्या प्रणालीनुसार विकासकाम ांच्या तपासणीसाठी खालील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल: कृत्रिम बुद्धिमत्ता व ड्रोन मॅपिंग: कामाचा दर्जा आणि अचूकता तपासण्यासाठी एआय चा वापर केला जाईल.

जिओ-टॅगिंग: प्रत्यक्ष कामाची प्रगती आणि ते वेळेत पूर्ण होत आहे का, यावर ऑनलाइन नजर ठेवली जाईल.

नागरिक आणि तज्ज्ञांचा सहभाग: या ऑडिट प्रक्रियेत केवळ सरकारी अधिकारीच नाही, तर नागरिक, रहिवासी संघटना, स्वयंसेवी संस्था, तांत्रिक तज्ज्ञ, शैक्षणिक संस्था आणि लोकप्रतिनिधींचा सहभाग निश्चित केला जाईल.

समितीची कार्यकक्षा आणि जबाबदारी: स्थापन करण्यात आलेली समिती १ म हिन्याच्या आत शासनाला अहवाल सादर करेल त्यामध्ये

पारदर्शकता आणणे: सध्या सुरू असलेल्या तांत्रिक व वित्तीय ऑडिट पद्धतीत अधिक सुधारणा सुचवणे.

एआय चा वापर: कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे अचूक लेखापरीक्षण करण्यासाठी शिफारशी करणे.

सामाजिक ऑडिट: विकासकामांचा नागरिकांना मिळणारा प्रत्यक्ष फायदा आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे.

कामाचा दर्जा व मुदत: चालू असलेली व प्रस्तावित विकासकामे वेळेत आणि गुणवत्तेसह पूर्ण व्हावीत यासाठी ठोस उपाययोजना सुचवणे.



## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचा पुन्हा एल्गार

### २९ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**जालना । प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला २९ ऑगस्ट २०२६ रोजी तब्बल ३ वर्षे पूर्ण होत आहेत. या महत्त्वपूर्ण टप्प्याच्या पार्श्वभूमीवर, मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारविरोधात आरपारच्या लढ्याची घोषणा केलीय. आज अंतरवाली सराटी येथे झालेल्या बैठकीत त्यांनी ही माहिती दिली.

पुन्हा एकदा केली उपोषणाची घोषणा : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाची घोषणा केलीय. मराठा आरक्षण आंदोलनाला २९ ऑगस्ट रोजी तीन वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत त्यांनी हा निर्णय जाहीर केला. जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला २८ ऑगस्टपर्यंत मराठा समाजाच्या विविध मागण्या पूर्ण करण्याची मुदत दिली आहे. अन्यथा २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे शेवटचं उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

दिल्लीत घेण्यात येणार मराठा समाजाचे अधिवेशन : आंदोलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मराठा बांधवांनी मोठ्या संख्येनं अंतरवाली सराटी येथे उपस्थित राहावं, असं आवाहन त्यांनी केलं. तसंच, प्रत्यक्ष उपस्थित राहणं शक्य नसलेल्या नागरिकांनी आपल्या गावात रॅली काढून मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असंही ते म्हणाले. यावेळी त्यांनी दिल्लीत मराठा समाजाचे अधिवेशन घेण्यात येणार असल्याची घोषणाही केली. मात्र, या अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. बैठकीत त्यांनी मराठा समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सरकारनं तातडीनं ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी केली.

## मराठा समाजासाठी महायुती सरकारएवढे निर्णय कोणीही घेतले नाहीत! : मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी :** ''मराठा समाजाच्या हितासाठी आणि कल्याणासाठी महायुती सरकारने जितके निर्णय घेतले आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली, तेवढे निर्णय यापूर्वी राज्यातील कोणत्याही सरकारने घेतलेले नाहीत. असे असतानाही जर कोणाच्या मनात काही शंका किंवा न्याय मिळत नसल्याची भावना असेल, तर राज्य सरकार संवादातून नक्कीच योग्य मार्ग काढण्यास तयार आहे,'' अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

राज्यात सापडलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे मराठा समाजाला प्रमाणपत्रे दिली जात नसल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला होता. यावर स्पष्टीकरण देताना मुख्यमंत्री म्हणाले की, ज्यांनी ज्यांनी नियमानुसार जात प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत, त्या बहुतांश नागरिकांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. सध्या यासंदर्भातील प्रलंबित प्रकरणांची संख्या अत्यंत कमी आहे. तरीही काही पात्र व्यक्ती यापासून वंचित राहिल्याचे कोणाला वाटत असेल, तर सरकार त्यांच्याशी सविस्तर चर्चा करून प्रश्न सोडवण्यास कटिबद्ध आहे. नीट पेपरफुटीबाबत मुंबईसह राज्यात झालेल्या आंदोलनादरम्यान महाराष्ट्र पोलिसांनी अत्यंत संयमाची भूमिका घेतली होती. या काळात विद्यार्थ्यांवर प्रामुख्याने जम ावबंदीचे जे गुन्हे दाखल झाले आहेत, ते सर्व गुन्हे मागे घेण्याचे स्पष्ट आदेश पोलीस आणि गृह विभागाला देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## मराठा आरक्षण कक्ष आठवडाभरात पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार: विखे

**राहाता । प्रतिनिधी :** मराठा आरक्षण कक्षासाठी पुढील सात दिवसांमध्ये आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरून हा कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जलसंपदा तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी दिले आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांम ध्ये प्रलंबित असलेल्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रांच्या सर्व प्रकरणांचा निपटारा तातडीने करावा. तालुकास्तरीय वंशावळ समितीस मुदतवाढ देण्यास सामाजिक न्याय विभागाला त्यांनी बैठकीत सांगितले. मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मंत्री विखे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मुंबईत पार पडली.




## राज्यात जूनच्या तुटीनंतर जुलैत पावसाची जोरदार बॅटिंग

### ९४ टक्के पाऊस, तर ८४ टक्के क्षेत्रावर खरीप पेरण्या पूर्ण

दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी :** जून महिन्यात तब्बल राज्यात ४७ टक्के पावसाची तूट निर्माण झाली होती. असं असताना जुलै महिन्याच्या पहिल्या दिवसापासून पुण्यासह राज्यातील विविध भागात मुसळधार पाऊस होत आहे. आतापर्यंत राज्यात ९४ टक्के पाऊस झाला आहे. कोकण विभागात १११ टक्के (सरासरी पेक्षा जास्त) तर नाशिक विभागात ८३ टक्के, पुणे विभागात ८७ टक्के, मराठवाडा विभागात ७७ टक्के आणि विदर्भात ७३ टक्के पाऊस झाला आहे. राज्यात आज अखेर १२०.८४ लाख हेक्टर (८४ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली आहे, अशी माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

अमरावती विभागात सर्वाधिक पेरणी : राज्यात चांगला पाऊस पडत आहे. १ जून ते २८ जुलैपर्यंत ४८०.४ मि.मी. पाऊस, सरासरीच्या ९४.८५ टक्के इतका पाऊस झाला आहे. या दोन महिन्यात ३३ पर्जन्य दिवस नोंदवले आहेत. कोणत्याही तालुक्यात सरासरीच्या २५ टक्केपेक्षा कमी पाऊस



झालेला नाही. राज्यात कोकण विभागात सर्वाधिक १८१८.१ मिमी. (१११टक्के) सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडला आहे. तर विदर्भ विभागात सर्वात कमी ३७४.६ मिमी. (७३टक्के) पाऊस झाला आहे. तसंच पेरणीच्या संदर्भात राज्यात आज अखेर १२०.८४ लाख हेक्टर (८४ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली आहे. अमरावती विभागात सर्वाधिक पेरणी झाली आहे. अमरावतीमध्ये २७.९५ लाख हेक्टर (९२ टक्के) झाली आहे. तर सर्वात कमी पेरणी ठाणे विभागात झाली असून एक लाख ५४ हजार ६७४ हेक्टर (३९ टक्के) एवढी झाली आहे. तर मराठवाडा विभागत ८६ टक्के आणि विदर्भ विभागत पेरणी ८१ टक्के पेरणी झाली आहे,'' अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार : महाराष्ट्रातील शेतकरी राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहेत. अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी आणि महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळं अनेक वेळा पिकांचं नुकसान होतं. पर्यायानं शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होतं. यामुळं बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाहीत. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळं त्यांना बँकांकडून नव्यानं पीककर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. सरकारनं पीककर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत कर्जमुक्ती देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. पहिली यादी जाहीर झाली असून यात १६ लाख शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यांची कर्जमाफी करण्यात येणार आहे. यानंतर पुढील यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे, असं कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं.

## जळगावमध्ये २००० महिलांना नाकारली लाडकी बहीण योजना

### महिला बालकल्याण अधिकाऱ्यांकडे अर्ज

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव । प्रतिनिधी :** एकीकडे राज्यातील लाखो लाडक्या बहिणी आम्हाला सरकारकडून पैसे मिळणे बंद झाल्याने संतप्त झाल्या आहेत. राज्यातील सुमारे ९२ लाख लाडक्या बहिणींना विविध कारणास्तव योजनेचा लाभ मिळणे बंद झाले असून दुसरीकडे तब्बल दोन हजार महिलांना लाडकी बहीण योजना आम्हाला नको, असे म्हणत महिला व बाल कल्याण विभागाकडे अर्ज केला आहे. एकावेळी एकच योजनेचा लाभ लाभार्थ्यांना घेता येणार असल्याच्या शासनाच्या धोरणामुळे जळगाव जिल्ह्यातील महिलांना हा निर्णय घेऊन शासनाला कळवले आहे.

जळगाव जिल्ह्यातील महिलांनी संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाडकी बहीण योजनेचा लाभ नको असल्याचं म्हटलं आहे. जळगावमधील या लाडक्या



बहिणींनी लाडकी बहीण योजनेचा लाभ आम्हाला नको असल्याचे सांगत, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांकडे अर्ज दिले आहेत. विधानसभा निवडणुकांपूर्वी सरकारने लाडकी बहीण योजना अंमलात आणली होती, त्याला महिलांनी मोठा प्रतिसाद दिला. त्यावेळी, सरकारने योजनेतील लाभार्थ्यांची चाळणी केली नव्हती. मात्र, आता चाळणी होत असून लाखो महिलांना योजनेतून थेट वगळण्यात येत आहे. ज्या लाडक्या बहिणींनी युती सरकारला मोठ्या मताधिक्याने विजयी केले होते. त्याच, लाडक्या बहिणींना आता योजनेची नियमावली आणि निकषांचा आधार घेत वगळण्यात येत आहे.

## विना परवाना अन्न पुरवठ्यावर बंदी; कॅन्टीन, अंगणवाड्यांना नियम कडक

### शालेय विद्यार्थ्यांच्या आहाराबाबत तुकाराम मुंढेंचा मोठा निर्णय!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे गेल्या काही महिन्यांपासून घडक कारवाई करत आहेत. अन्नात भेसळ करणाऱ्यांवर राज्यभर कारवाई सुरू आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी राज्यातील हॉटेल्ससाठी नियमावली जारी केली होती. अशातच आता मुंढे यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या आहाराबाबत मोठा निर्णय घेतला आहे. आता विना परवाना अन्न पुरवठा करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. आज पत्रकार परिषद घेत तुकाराम मुंढे यांनी याबाबतची घोषणा केली.

विद्यार्थ्यांना चांगलं अन्न देणं गरजेचं : बुधवारी (दि. २९) झालेल्या पत्रकार परिषदेत तुकाराम मुंढे म्हणाले, ''राज्यभरात आमच्या कारवाया सुरू आहेत. राज्यात सुमारे २ कोटी शाळकरी मुलं आहेत. शाळेच्या पोषण आहाराबाबतचे नियम २०२० मध्ये आणि ते २०२१ मध्ये झाले. आम्ही फुड सेफ्टीसाठी जे करता येईल, ते करत आहोत. राज्यात धाडसत्र सुरू आहे. राज्यात दोन कोटी विद्यार्थी शासकीय शाळेत जातात. त्यांच्या शाळेला फूडचे नियम लागू होतात. त्यांना चांगलं अन्न देणं गरजेचं आहे'', अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली.

अन्न परवाना बंधनकारक : शालेय आहाराबाबत अनेकजण संभ्रमात आहेत. कोणत्या विभागानं कोणतं काम करायचं? याचे नियम नाहीत. आपण यासंदर्भात इंप्लिमेंटशन करत आहोत. शालेय मुलांना सकस आहार, सुरक्षित आहार मिळायसाठी नवी धोरणं राबवत आहोत. राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, विना अनुदानित शाळांना हे नियम लागू होणार आहेत. कॅन्टीन, वसतिगृह, अंगणवाडीत अन्न पुरविणाऱ्यांना अन्न परवाना बंधनकारक असणार आहे. विना परवाना शाळेत, अंगणवाडीत वसतिगृहात अन्न पुरवता येणार नाही, असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं.



CMYK

## दळणवळणाच्या सुविधेमुळे राज्याला देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान

महाराष्ट्र हा देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि व्यापार क्षेत्राचा कणा मानला जातो. उद्योग, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया, बंदरे आणि दळणवळणाच्या सुविधा यामुळे राज्याने देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. आता या विकासाला आणखी वेग देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. महाराष्ट्रातील 'जेएनपीटी' हे देशातील सर्वांत मोठे कंटेनर बंदर असून भारतातील सुमारे ६० टक्के कंटेनर वाहतूक या बंदरातून केली जाते. याशिवाय पालघर जिल्ह्यात विकसित होणारे वाढवण बंदर हे भविष्यात जगातील १० सर्वांत मोठ्या बंदरांपैकी एक ठरण्याची क्षमता बाळगते. या दोन्ही बंदरांना राज्यातील औद्योगिक पट्टे, ड्राय पोर्ट्स आणि समृद्धी महामार्गाशी रेल्वेद्वारे जोडल्यास निर्यात-आयात प्रक्रिया अधिक वेगवान आणि स्वस्त होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पामुळे हा खर्च सुमारे सात ते आठ टक्क्यांपर्यंत आणण्याचे लक्ष्य व्यक्त केले आहे. हे उद्दिष्ट साध्य झाले, तर महाराष्ट्रातील उद्योगांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी स्पर्धात्मक ताकद मिळू शकते. हा रेल्वे कॉरिडॉर समृद्धी महामार्गालगत उभारण्याचा विचार आहे. नागपूर ते मुंबई जोडणाऱ्या या महामार्गासाठी आधीच रेल्वेमार्गासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जमीन संपादनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात टाळता येईल. हा मार्ग जालना आणि वर्धा येथील ड्राय पोर्टसना जोडत गडचिरोलीपर्यंत विस्तारण्याचा विचार आहे. विशेषतः गडचिरोली जिल्हा खनिज संपत्तीने समृद्ध असून भविष्यात स्टील आणि खनिजाधारित उद्योगांचे मोठे केंद्र बनण्याची क्षमता आहे. त्यामुळे या भागातील औद्योगिक विकासाला नवे बळ मिळेल. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. राज्याचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के वाटा आहे, तर देशाच्या एकूण निर्यातीत जवळपास २० टक्के योगदान महाराष्ट्राचे आहे. ही आकडेवारी राज्याच्या औद्योगिक सामर्थ्याची साक्ष देते. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, वस्त्रोद्योग आणि सेवा क्षेत्रात महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि डेटा सेंटर क्षेत्रातही वेगाने पुढे जात आहे. देशातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात विकसित होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), 'क्लाऊड कॉम्प्युटिंग', डिजिटल सेवा आणि फिनटेक क्षेत्रातील वाढ लक्षात घेता डेटा सेंटरचे महत्त्व अधिक वाढत आहे. त्यांनी मुंबई आणि पुणे या दोन शहरांना भारताचे 'क्वांटम व्हॅली' असे संबोधले. 'क्वांटम कॉम्प्युटिंग', कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, संशोधन आणि नवोपक्रम यामध्ये ही दोन्ही शहरे विकसित होत असून प्रस्तावित हाय-स्पीड रेल्वे व इतर दळणवळण प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे हा देशातील सर्वांत मोठा तंत्रज्ञान आणि नवोपक्रम आर्थिक कॉरिडॉर ठरू शकतो. मोठ्या उद्योगांकडे स्वतःची वाहतूक व्यवस्था असते; परंतु लहान उद्योगांना वाहतूक खर्चाचा मोठा फटका बसतो. बंदरांशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध झाल्यास त्यांचा खर्च कमी होईल आणि त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्याची संधी मिळेल. शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योगांनाही या प्रकल्पाचा मोठा फायदा होईल. महाराष्ट्रात द्राक्षे, डाळिंब, संत्री, कांदा, ऊस, कापूस, सोयाबीन आणि इतर अनेक कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर तयार होतात. ही उत्पादने कमी वेळेत बंदरांपर्यंत पोहोचल्यास निर्यात वाढू शकते. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वेमुळे इंधनाचा वापर कमी होतो, कार्बन उत्सर्जन घटते आणि रस्त्यांवरील वाहतुकीचा ताणही कमी होतो. त्यामुळे शाश्र्वत विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरतो. अर्थात, एवढा मोठा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अनेक आव्हानेही आहेत. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय, रेल्वे मंत्रालयाचे सहकार्य, पर्यावरणीय मंजुरी, स्थानिक पायाभूत सुविधा आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्राने यापूर्वी समृद्धी महामार्ग, मेट्रो प्रकल्प, किनारी रस्ते, नवीन विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि विविध लॉजिस्टिक पार्क उभारून पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची झेप घेतली आहे. प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा त्या विकासाचा पुढचा टप्पा ठरू शकतो. या प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू केवळ मुंबई-पुण्यापुरता मर्यादित न राहता विदर्भ, मराठवाडा आणि इतर भागांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. या दिशेने सातत्याने पावले उचलल्यास अधिक परकीय गुंतवणूक आकर्षित होईल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि राज्याच्या आर्थिक विकासाला नवी गती मिळेल. एकंदरीत, 'जेएनपीटी' आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गाशी जोडणारा प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नाही, तर तो महाराष्ट्राच्या भविष्यातील औद्योगिक, आर्थिक आणि निर्यातक्षम विकासाचा पाया ठरू शकतो. बंदरे, महामार्ग, रेल्वे आणि औद्योगिक क्षेत्र यांची साखळी मजबूत झाली, तर महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून अधिक सक्षमपणे उदयास येईल. या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाली, तर 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनांना प्रत्यक्ष बळ मिळेल. भारताच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि जागतिक व्यापारात देशाचे स्थान बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या काही दशकांमध्ये भारताने रस्ते, रेल्वे आणि बंदरांच्या आधुनिकीकरणावर विशेष भर दिला आहे. याच मालिकेतील एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि 'गेम चेंजर' प्रकल्प म्हणजे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीटी) आणि नियोजित वाढवण बंदर यांना जोडणारा स्वतंत्र रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर (डेडिकेटेड फ्रीट कॉरिडॉर). महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावर आकाराला येत असलेला हा रेल्वे कॉरिडॉर केवळ दोन बंदरांना जोडणारा मार्ग नसून भारताच्या आयात-निर्यात क्षेत्राची कार्यक्षमता वाढवणारा, लॉजिस्टिक खर्च कमी करणारा आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराला नवी दिशा देणारा एक महामार्ग ठरणार आहे.

# आजचा युवक सरकार बदलू शकतो, अभिजीत दिपके यांचा सरकारला इशारा

**दैनिक आपला विदर्भ**



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** : कॉक्रोच जनता पार्टीचा प्रमुख अभिजीत दिपके आपल्या घरी परतला विमानतळावर तिच्या कुटुंबीयांनी त्याचं जंगी स्वागत केलं. यावेळी त्याच्या आई-वडिलांनी त्याला जवळ कवटाळून घेत त्याचा अभिनंदन केलं. कुटुंबीयांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रु आले होते. शहरात येताच अभिजीतने सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला. चाळीस दिवसांनी घरी आल्याचा आनंद आहे, आधी आंदोलन सुरू होतं, जंतरमंतरवर आंदोलन झालं. त्याला यश आलं त्याचा आनंद आहे. सरकारने आता सुधारावे, रस्त्यावर विद्यार्थ्यांचे रक्त वाहिले, आता पोलीस विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्रास देत आहेत. हे बरोबर नाही, आता जर सरकारने सुधारणा केली नाही तर धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला पुढे सरकार बदलल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा अभिजित दिपके यांनी दिला.

आंदोलन करणारे देशद्रोही नव्हते – कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने दिल्ली येथे जंतर-मंतरवर नीट पेपर फुटीबाबत आंदोलन केलं. जवळपास ३६ दिवस हा संघर्ष सुरू राहिला आणि शेवटी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश आलं, याचा केंद्रबिंदू राहिले अभिजीत दिपके. आंदोलनात यश मिळाल्यानंतर ते प्रथमच आपल्या घरी पोहोचले, त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत असताना आंदोलन करणारे कोणी देशद्रोही नाही तर या देशाचे भविष्य होते असं विधान केलं. आंदोलन करताना देशभरातून मोठा प्रतिसाद आम्हाला मिळाला. वेगवेगळ्या राज्यातून विद्यार्थी मोठ्या संख्येनं आंदोलनात सहभागी झाले होते. मात्र सरकारनं वीस तारखेला ज्या पद्धतीनं लाठीहल्ला केला, याच विद्यार्थ्यांचं रक्त रस्त्यावर सांडलं होतं. आता आंदोलन झालं मात्र पोलीस विद्यार्थ्यांना त्रास देत आहेत. त्यांच्या घरी जाऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची धमकी देखील देत आहेत. आमच्या आंदोलनामुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागू शकतो, तर सरकार देखील तो बदलू शकतो. त्यामुळे सरकारने आता विद्यार्थ्यांना त्रास देऊ नये असा इशारा अभिजीत दिपके यांनी दिला.

आई वडिलांनी समाधान व्यक्त केलं – अभिजीतच्या येण्यामुळे खूप आनंद होत असल्याचं मत आई-वडिलांनी व्यक्त केलं. ''अभिजीत आंदोलन करत असताना नेहमी चिंता लागायची. तो अनेकवेळा फोन उचलत नव्हता, त्यामुळे नेहमी भीतीच्या सावटाखाली आम्ही असायचो. रात्र रात्रभर फक्त त्याच्या फोनची वाट बघत जागं राहावं लागत होतं. मात्र त्याचा आवाज ऐकला की आपोआपच आम्हाला समाधान वाटत होतं. आज तो परत येतोय त्यामुळे आजचा दिवस आमचा आनंदाचा दिवस आहे. आज गुरुपौर्णिमा आहे, आता तोच आमचा गुरू झालाय. कारण ज्या पद्धतीने देशात त्यांनी आंदोलन केलं, विद्यार्थ्यांसाठी लढा लढला त्याने एका गुरुचं काम केलं आहे. त्यामुळे त्याला गुरू म्हणणं काही चुकीचं राहणार नाही'', असं मत आई अनिता दिपके यांनी व्यक्त केलं.

त्याने नोकरी सोडून विद्यार्थ्यांसाठी लढा दिला – अभिजीत विमानाने छत्रपती संभाजीनगर येथे दाखल झाले त्यावेळी त्याचे वडील भगवान दिपके यांना अश्रू अनावर झाले. ''आजकाल दहा बाय दहाचे दुकान कोणी रिकामे करत नाही, मात्र अभिजीतने अमेरिकेत असलेली नोकरी सोडून तो फक्त आणि फक्त विद्यार्थ्यांसाठी भारतात आला. त्याने जो लढा लढला तो सत्ताधाऱ्यांच्या विरोधात होता आणि त्याला यश आले. आता सर्व लोकांनी त्याला सांभाळून घेण्याची गरज आहे. तो जेव्हा आंदोलन करत होता, त्यावेळी आम्ही त्याला सतत संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होतो. मात्र त्याच्यासोबत बोलणं होत नसायचं. मात्र, आज तो परत येतोय त्याला आता घरीच आराम करण्याचा सल्ला आम्ही देणार आहोत'', असं मत वडील भगवान दिपके यांनी व्यक्त केलं.

## अभिनेता सोनू सूदने शिर्डीत अनाथ मुलांसोबत साजरा केला वाढदिवस

**दैनिक आपला विदर्भ**

**राहाता । प्रतिनिधी** : चित्रपट अभिनेता सोनू सुद याने आज, बुधवारी गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त शिर्डीत साई दरबारी हजेरी लावत दर्शन घेतल्यानंतर आपला वाढदिवस साई आश्रया परिवारातील आजी, आजोबा आणि चिमुकल्या अनाथ मुलांसोबत केक कापून साजरा केला.

अभिनेता सोनू सूद गेल्या पंधरा वर्षांपासून, व्हिडिओ कॉल करून आश्रमातील अनाथ मुलांसोबत आनंद साजरा करत असतो. मात्र यंदा चिमकल्या मुलांसह आजी व आजोबांना देखील सोनू सूद येणार असल्याने मोठी उत्सुकता होती. आज अखेर सोनू सूदने आश्रमात हजेरी लावत केक कापून वाढदिवस साजरा केला आणि उपस्थित सर्वांना कपडे, शैक्षणिक साहित्य तसेच खाण्यापिण्याच्या वस्तू देत यापुढील काळात शुद्ध पाण्याचा प्रक्रिया यंत्र आणि इतर सर्वोतोपरी मदत देण्याचे आश्वासन दिले. आश्रमाचे संस्थापक गणेश दळवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या कामाचे सोनू सूदने तोंडभरून कौतुक केले तसेच त्यांच्या हातून होत असलेली इतक्या मोठ्या प्रमाणात सेवा हीच खरी साई सेवा असल्याचे यावेळी त्याने सांगितले.

निस्सिम साईभक्त व आपल्या समाजसेवेसाठी प्रसिद्ध असलेला बॉलीवूड अभिनेता सोनू सूद याने आज गुरुपौर्णिमा उत्सव निमित्त शिर्डीत येत श्री साईबाबा समाधी मंदिरात बाबांचे मनोभावे दर्शन घेतले. त्याचा साईबाबा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी लहान थोरांमध्ये लोकप्रिय असलेला सोनू सूद साई मंदिर परिसरात आल्याने चाहत्यांनी त्याच्याशी हात मिळविण्यासाठी एकच गर्दी करत त्याला अक्षरशः घेराव घातला. यात प्रामुख्याने दक्षिण भारतीय वयस्कर महिला भाविकांनी सोनू सूदशी हस्तांदोलन केले तसेच तरुणांनी देखील सेल्फी फोटो मिळावा म्हणून मोठी गर्दी केली होती.

## ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकरांचा व्ही शांताराम पुरस्काराने गौरव, प्रसाद ओक अन् राणी मुखर्जीही पुरस्काराने सन्मानित

**मुंबई । प्रतिनिधी** : राज्य सरकारकडून चित्रपती व्ही. शांताराम पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून, ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना तो जाहीर करण्यात आला आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाकडून गुरुवारी २०२५च्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आलीय. अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष पुरस्कारानं गौरविण्यात आले आहेत. तसेच अभिनेत्री राणी मुखर्जी हिला राज कपूर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे वर्ष २०२५ चे 'चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांना, तर 'स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना जाहीर करण्यात आलाय. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी या पुरस्कारांची घोषणा केली असून, सांस्कृतिक कार्य विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

प्रसाद ओक यांचाही चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कारानं सन्मान : मंगेशकरांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील संगीताचा ठसा उमटवलाय. भावगीत, भक्तिगीत, शास्त्रीय संगीतावर आधारित रचनांनी त्यांनी भारतीय संगीतविश्व समृद्ध बनवलं. त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा सन्मान म्हणून हा मानाचा पुरस्कार त्यांना देण्यात येतोय. विशेष म्हणजे प्रसाद ओक यांचाही चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कारानं सन्मान करण्यात आला असून, अभिनयापासून दिग्दर्शनापर्यंत प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपली वेगळी छाप सोडलीय. विशेषतः 'धर्मवीर' आणि 'धर्मवीर २' या चित्रपटांच्या दिग्दर्शनामुळे त्यांची देशभरात मोठी चर्चा झाली होती.

'सलीम जावेद' जोडी भारतीय चित्रपटसृष्टीत प्रसिद्ध : हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना राज कपूर जीवन गौरव पुरस्कार मिळालाय. पटकथालेखक जावेद अख्तर यांच्यासोबत 'सलीम जावेद' या जोडीने भारतीय चित्रपटसृष्टीला अनेक हिट चित्रपट दिले. 'शोले', 'दीवार', 'जंजीर', 'डॉन', 'त्रिशूल' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांच्या कथा आणि पटकथेमुळे त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत नवा इतिहास घडवला.

राणीच्या अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये अजरामर भूमिका : विशेष म्हणजे अभिनेत्री राणी मुखर्जीचाही राज कपूर विशेष योगदान पुरस्कार मिळालाय. दमदार अभिनयामुळे राणीने अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये अजरामर भूमिका केल्या आहेत. 'ब्लॅक', 'हम तुम', 'मर्दानी', 'वीर-झारा', 'नो वन किल्ड जेसिका' यांसारख्या चित्रपटांमधील तिच्या अभिनयाचं प्रेक्षकांसह समीक्षकांनीही भरभरून कौतुक केलंय. राष्ट्रीय तसेच अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार तिच्या नावावर आहेत.

# जुने कर्ज माफ, अन् एका दिवसातच मिळणार नवे पीक कर्ज !

निसर्गाचा लहरीपणा, सततच्या दुष्काळामुळं मराठवाड्यासह राज्यातील शेतकरी कायम आर्थिक संकटात असतो. या दुष्टचक्रातून बळीराजाला कायमचे बाहेर काढण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. २५ जुलै रोजी या योजनेची पहिली यादी जाहीर झाली आहे. राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी या योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीबाबत सविस्तर सांगितले आहे. या योजनेत केवळ कर्जमाफीच नाही, तर शेतकऱ्याला तत्काळ पुन्हा उभे करण्याची मोठी ताकद आहे. पहिल्या टप्प्यातील यादीत मराठवाडा विभागातील जवळपास सहा लाखांहून अधिक शेतकरी पात्र झाले आहेत.

**योजनेची सर्वात जमेची बाजू : अवघ्या एका दिवसात नवीन कर्ज!**

एरवी कोणतीही कर्जमाफी झाली, तरी नवीन पीक कर्ज मिळण्यासाठी बँकांचा कुलिंग ऑफ पिरियड असतो. यासाठी बँका अनेक महिने किंवा चक्क एक वर्ष वाट पाहायला लावतात. पण या योजनेत शासनाने एक मास्टरस्ट्रोक लगावला आहे. सहकार आयुक्तांनी सर्व बँकांना स्पष्ट निर्देश दिले आहेत, की या कर्जमाफीनंतर हा कुलिंग ऑफ पिरियड फक्त एका दिवसाचा असेल. म्हणजेच शेतकऱ्याने आज आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन स्वतःचे आधार प्रमाणीकरण पूर्ण केले. त्याची कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाली, की त्याला अवघ्या एका दिवसात नवीन पीक कर्ज मिळू शकेल. आगामी हंगामासाठी बी-बियाणे आणि खते घेण्यासाठी शेतकऱ्याला कोणाकडेही हात पसरावे लागणार नाहीत. ही या संपूर्ण योजनेची सर्वात मोठी आणि क्रांतीकारी जमेची बाजू आहे.




**पहिल्या टप्प्यात मराठवाड्याला सर्वाधिक लाभ**

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील तब्बल १६ लाख ९६ हजार (सुमारे १७ लाख) शेतकरी कर्जमुक्त होत आहेत. या माध्यमातून १३ हजार ६०० कोटी रुपयांची थेट कर्जमाफी दिली जात आहे. विशेष म्हणजे, या पहिल्या यादीत मराठवाड्याचा वाटा सर्वात मोठा आहे. जवळपास सहा लाख ३७ हजार ९३५ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात लाभ मिळणार आहे. राज्यातील सर्वाधिक लाभार्थी असलेल्या राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये मराठवाड्यातील दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. एकट्या जालना जिल्ह्यात एक लाख सात हजार ५०५, तर छत्रपती संभाजीनगरमध्ये एक लाख पाच हजार १२८ शेतकऱ्यांना लाभ मिळत आहे. छत्रपती संभाजी नगर विभागातील परभणीमध्ये ७९ हजार ८५५, हिंगोलीमध्ये ४४ हजार २१३ पात्र लाभार्थी शेतकरी आहेत. सहकार विभागाच्या लातूर विभागांतर्गत बीडमध्ये सर्वाधिक ९९ हजार ६३१, त्यापाठोपाठ नांदेड ९९ हजार ५४, लातूर ५४ हजार ६६३ आणि धाराशिवमध्ये ४७८८६ शेतकरी या योजनेतून पहिल्या टप्प्यात कर्जमुक्त होत असल्याचे लातूर विभागाच्या सहकारी संस्थांचे विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी सांगितले. यासह योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन देखील केले.

**शेतकऱ्यांनी आता नेमके काय करायचे आहे?**

नवीन पीक कर्जाचा मार्ग मोकळा करण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी खालील सोपी प्रक्रिया त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे:

**१. सेवा केंद्रात जा :** यादीत नाव आल्यास आपले आधार कार्ड घ्या आणि त्वरित जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जा.

**२. ॲग्रीस्टॅक आयडी:** या प्रक्रियेसाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे. तुमच्याकडे तो नसेल, तर केंद्रावरच तत्काळ काढून मिळेल.

**३. रक्कम तपासा:** स्क्रीनवर तुमची ३१ मार्च २०२६ पर्यंतची थकबाकीची मुद्दल दिसेल. ती अचूक असल्यास बायोमेट्रिक (अंगठ्याचा ठसा) देऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करा.

**४. बेबाकी प्रमाणपत्र:** प्रक्रिया पूर्ण होताच तुम्हाला बेबाकी प्रमाणपत्र मिळेल आणि नवीन कर्जाचा मार्ग खुला होईल.

**दोन लाखांवरील कर्जासाठी एकवेळ समझोता**

ज्या शेतकरी बांधवांचे कर्ज दोन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांनाही वाऱ्यावर सोडलेले नाही. त्यांच्यासाठी एकवेळ समझोता योजना आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार, तुमचे खाते एनपीए झाल्यानंतरचे सर्व व्याज माफ केले जाईल. तसेच मुदलातही मोठी सवलत मिळेल. सवलतीनंतर उरलेली दोन लाखांवरची रक्कम तुम्ही भरल्यास, शासनाकडून तुमचे दोन लाख रुपये माफ केले जातील.

**थोडक्यात सांगायचं तर...**

ही केवळ एक कर्जमाफी नाही. शेतकऱ्याला पुन्हा आत्मसन्मानाने उभे करण्याची एक सुसज्ज यंत्रणा आहे. जुने कर्ज माफ आणि लगेच दुसऱ्या दिवशी नवीन कर्ज, हा निर्णय कृषी क्षेत्रासाठी संजीवनी ठरणार आहे. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी अजिबात वेळ न दवडता त्वरित आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. विकासाच्या या नव्या प्रवाहात सामील व्हावे !

---

**डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### कोयना धरणाच्या 'शिवाजी सागर' जलाशयाचे नाव बदलले, सरकारचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : पश्चिम महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी आणि वरदान ठरलेल्या कोयना धरणाच्या जलाशयाचे नाव आता अधिकृतपणे 'छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर' असे करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतला असल्याची माहिती जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय (उीं) जारी करण्यात आला आहे.

कोयना जलसागराला यापूर्वी 'शिवाजी सागर' या नावाने ओळखले जात होते. मात्र, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख अयोग्य असल्याने, या जलाशयाला महाराजांचे पूर्ण आणि आदरयुक्त नाव देण्यात यावे, अशी आग्रही मागणी शिवप्रेमी नागरिक आणि विविध संघटनांकडून सातत्याने केली जात होती.

या लोकभावनेची दखल घेत जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत विशेष पुढाकार घेतला होता. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन कोयना जलाशयाचे औपचारिक नामांतर करण्याची विनंती केली होती. जलसंपदा विभागाच्या या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत महायुती सरकारने तत्काळ शासन निर्णय जारी केला.

पूर्वीच्या 'शिवाजी सागर' या नावाऐवजी आता 'छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर' असे नाव निश्चित झाल्यामुळे शिवप्रेमी नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जलसागराचे नामांतर करण्याच्या या ऐतिहासिक निर्णयाबद्दल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारचे विशेष आभार मानले आहेत.

कोयना धरण हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या जलप्रकल्पांपैकी एक असून, या निर्णयामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा योग्य तो आदर आणि सन्मान राखला गेला असल्याची भावना सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहे. शासकीय कागदपत्रे आणि दैनंदिन व्यवहारात आता याच नव्या नावाचा अधिकृत वापर केला जाईल.

### विद्यार्थ्यांया गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षणावर भर -मंत्री दादाजी भुसे

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई । प्रतिनिधी** : शालेय शिक्षण विभागांतर्गत कार्यरत जवाहर नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय, सैनिकी शाळा, शासकीय विद्यानिकेतन आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या शाळांमधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षणावर अधिक भर देण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. या अनुषंगाने या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे, सोयी सुविधा, विद्यार्थ्यांची प्रवेश स्थिती अभ्यासाचे मूल्यमापन याबाबत त्यांनी मंत्रालयात मंगळवारी आयोजित बैठकीत सविस्तर आढावा घेतला.शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालक, विभागातील वरिष्ठ अधिकारी; तसेच संबंधित संस्थांचे प्राचार्य आणि कार्यालय प्रमुख यावेळी उपस्थित होते.

शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मंजूर, कार्यरत व रिक्त पदांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. याचबरोबर विविध संस्थांच्या इमारतींची सद्यस्थिती, शासनाकडून मंजूर झालेल्या अनुदानाचा वापर, खर्च व शिल्लक निधी, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची सद्यस्थिती, अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, मूल्यमापन प्रक्रिया तसेच विविध योजनांच्या प्रगतीचा मंत्री दादाजी भुसे यांनी सविस्तर आढावा घेतला.

ज्या जिल्ह्यांमध्ये केंद्रीय विद्यालयांच्या शाळा नाहीत तेथे त्या सुरू करण्याबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, सैनिकी शाळांमधील विद्यार्थ्यांनी परिसरातील इतर शाळांमधून प्राथमिक प्रशिक्षण द्यावे, शासकीय विद्यानिकेतनमधील विद्यार्थी पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत, अशा सूचना मंत्री भुसे यांनी यावेळी दिल्या.

सर्व संस्थांमध्ये सुरू असलेल्या सोयी-सुविधांच्या कामांना अधिक गती देत गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक बाबी वेळेत पूर्ण कराव्यात असे सांगून मंत्री भुसे यांनी विद्यार्थीहित, शैक्षणिक गुणवत्ता आणि संस्थांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# राज्यात 'एसआयआर'चे ८७.७९ टक्के काम पूर्ण!

## शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात सर्वाधिक काम

दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी** : विशेष मतदार सखोल पुनरीक्षण मोहिमेत (एसआयआर) राज्यात ८७.७९ टक्के गणना नुमन्यांचे वितरण करण्यात आले असून, ६०.४४ टक्के नमुने डिजिटल स्वरूपात अपलोड झाले आहेत. 'एसआयआर'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदारयादी त्रुटीमुक्त आणि अचूक तयार करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार, येत्या आठ ऑगस्टपर्यंत केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदार पडताळणी करणार आहेत. राज्यातील ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ म तदारांपैकी ८ कोटी ५९ लाख ५ हजार मतदारांना गणना नमुने वितरित करण्यात आले असून, ५ कोटी ९१ लाख ४२ हजार ६२४ नमुन्यांचे डिजिटायझेशन झाले आहेत. ग्रामीण भागात हे काम सर्वाधिक झाले आहे.

जळगाव (९९.९१ टक्के), हिंगोली (९९.९८), बुलढाणा (९९.८१), अम रावती (९९.७७), वर्धा (९९.७६) आणि सिंधुदुर्ग (९९.७३) या जिल्ह्यांमध्ये जवळपास सर्वच मतदारांपर्यंत गणना नमुने पोहोचले आहेत. डिजिटायझेशनमध्ये रत्नागिरी (८६.०३ टक्के), यवतमाळ (८५.२०), बुलढाणा (८२.६६), हिंगोली (८२.६३), गडचिरोली (८०.८४) आणि चंद्रपूर (८०.०२) हे जिल्हे आघाडीवर आहेत.




महानगर आणि शहरी भागांमध्ये कामाचा वेग तुलनेने कमी असल्याचे आकडेवारीतून दिसते. ठाण्यात केवळ ६७.९७ टक्के, मुंबई उपनगरात ६७.७९ टक्के आणि पुण्यात ७० टक्के नमुने वितरित झाले आहेत. डिजिटायझेशनमध्ये ठाणे (२७.५६ टक्के), मुंबई उपनगर (२८.७२), मुंबई शहर (३८.८८), पालघर (३९.९५) आणि पुणे (४५.०४) हे जिल्हे राज्याच्या सरासरीपेक्षा मागे आहेत.

पुणे जिल्ह्यातील मतदारसंघ आणि म तदारांची संख्या लक्षात घेता पुणे जिल्ह्याचे काम राज्यात अव्वल असल्याचा दावा जिल्हा निवडणूक शाखेकडून करण्यात आला. पुणे जिल्ह्यात २१ मतदारसंघ असून, ९० लाख ८० हजार १७३ मतदारांच्या नोंदीची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. त्यापैकी ६३ लाख ५५ हजार १७५ मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात डिजिटायझेशनचे काम ४५.०४ टक्के झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक शाखेकडून देण्यात आली.

जिल्हा – मतदान केंद्रे – प्रत्यक्ष पडताळणी – टक्केवारी – डिजिटायजशेन

नंदूरबार – १४३४ – १३,४८,५७४ – ९७.८५ – ७०.६

धुळे – ७५२ – १८,३५,१२५ – ९९.२८ – ६९.८१

जळगाव – ३६७७ – ३५,५२,१९९ – ९९.९१ – ७३.४२

बुलढाणा – २२८८ – २०,८९,९६५ – ९९.८१ – ८२.६६

अकोला – १७४१ – १५,९५,६४४ – ९७.११ – ७३.४२

वाशिम – ११०० – १०,१९,५१९ – ९७.०३ – ७६.०४

अमरावती – २६८२ – २५,४५,६७७ – ९९.७७ – ७६.५५

वर्धा – १३४२ – ११,३७,२४२ – ९९.७६ – ७७.४२

नागपूर – ४६१० – ४६,३८,५८९ – ८१.३८ – ४७.६२

भंडारा – ११६७ – १०,१०,७८८ – ९८.८३ – ७५.८६

गोंदिया – १२८५ – ११,२७,८०५ – ९८.५१ – ७७.०८

गडचिरोली – ९७२ – ८,२८,९०४ – ९८.९९ – ८०.८४

चंद्रपूर – २०७६ – १७,९७,६५५ – ९८.०४ – ८०.०२

यवतमाळ – २५७८ – २२,५३,२३६ – ९८.१ – ८५.२

नांदेड – ३०८८ – २७,७७,०७३ – ९५.५ – ७८.०४

हिंगोली – १०१५ – ९,६९,३८५ – ९९.९८ – ८२.८३

परभणी – १६२३ – १५,४१,००७ – ९९.१ – ८१.९४

जालना – १७५५ – १६,८२,७२३ – ९९.१२ – ७३.६९

छत्रपती संभाजीनगर – ३२६४ – ३२,१६,१६७ – ८६.१ – ६४.३२

नाशिक – ४९१९ – ५१,०४,४५८ – ८५.७८ – ५७.८८

ठाणे – ६८९४ – ७४,५०,५१५ – ६७.९७ – २२.५६

मुंबई उपनगर – ७५७४ – ७८,३०,०११ – ६७.७९ – २८.७२

मुंबई शहर – २५३७ – २५,५५,४९९ – ७२.३७ – ३८.८८

रायगड – २७९० – २५,३३,७३९ – ९५.०१ – ५८.१२

पुणे – ८४१७ – ९०,८०,१७३ – ७० – ४५.०४

अहिल्यानगर – ३८३० – ३८,१०,१०२ – ९९.२५ – ७७.५२

बीड – २४१६ – ३१,९३,८२७ – ९६.३७ – ७९.५५

लातूर – २१४२ – २०,०४,४५० – ९८.६४ – ७०.४६

धाराशिव – १५२३ – १४,१३,८६४ – ९९.०२ – ६७.८६

सोलापूर – ३७२३ – ३९,४१,०९५ – ९६.७१ – ६६.५

सातारा – ३१६५ – २६,५१,३४७ – ९७.४९ – ७६.९६

रत्नागिरी – १७४७ – १३,२९,०४२ – ९८.१५ – ८६.०३

सिंधुदुर्ग – ९२१ – ६,८८,०१४ – ९९.७३ – ७५.३१

कोल्हापूर – ३४५० – ३३,५५,२४४ – ९७.२६ – ७१.९

सांगली – २४८२ – २५,७३,३३९ – ९६.१७ – ७०.७५

पालघर – २२७४ – २३,७६,०५३ – ७९.७३ – ३९.९५

एकूण – १,००,२५३ – ९,७८,५४,०४९ – ८७.७९ – ६०.४४

### अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मंदिर परिसराचा म्हाडामार्फत होणार नियोजनबद्ध विकास

**मुंबई । प्रतिनिधी** : अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसराचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यास उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. यामुळे मंदिर परिसरातील रस्ते, वाहनतळ, आरक्षण क्षेत्रांचा विकास आणि आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली होती त्याचबरोबर त्यांनी याबाबत पाठपुरावा देखील केला होता. त्यानुसार अक्कलकोट नगरपरिषद, सोलापूर जिल्हाधिकारी आणि म्हाडा यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार, अक्कलकोट मंदिर परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण व विकास, वाहनतळ उभारणी, आरक्षित जागांचा विकास तसेच परिसराचे सुयोग्य नियोजन करण्याची कामे हाती घेतली जाणार आहेत.

## 3 लाख पदवी रॅकेट प्रकरणी पहिली कारवाई, पुणे विद्यापीठाकडून एका कर्मचाऱ्याचे निलंबन, पदवी विकली कशी?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी** : शिक्षणाचं माहेर घर असलेल्या पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये ३ लाखांमध्ये पदवी विकत असल्याचा आरोप एका पालकाने केला होता. त्यानंतर पुणे विद्यापीठाने या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. अखेरीस या प्रकरणी पुणे विद्यापीठाने एका कर्मचाऱ्याचं निलबंन केलं आहे. पुणे विद्यापीठाकडून ही पहिलीच कारवाई आहे, पण, पदवी विकणारं रॅकेट नसल्याचा दावाही विद्यापीठाने केला आहे.

पुणे विद्यापीठामध्ये एका रिक्षाचालक पालक महेश कदम यांनी ३ लाखांमध्ये पदवी विकत असल्याचा आरोप केला होता. याबद्दल काही पुरावेही त्यांनी माध्यमांना दिले होते. त्यानंतर आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील कर्मचाऱ्यावर बनावट गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. वित्त व लेखा विभागातील कर्मचारी रमेश दामोदर मुखेकर याने ७० हजार रुपये घेऊन बनावट कागदपत्रे दिल्याची तक्रार आहे.

या कर्मचाऱ्याने व्हॉट्सॲपवर मूळ कागदपत्रांसारखी भासणारे फोटो पाठवल्याचा आरोप आहे. संबंधित कर्मचारी परीक्षा विभागात कार्यरत नसून कागदपत्रे परीक्षा विभागाच्या अभिलेखांशी सुसंगत नसल्याचे स्पष्टीकरण सुद्धा पुणे विद्यापीठाने दिलं आहे.

पुणे विद्यापीठाचा अजब खुलासा

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन रमेश मुखेकर यांना तात्काळ सेवेतून निलंबित करण्यात आलं आहे. या प्रकरणी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात विद्यापीठाकडून अधिकृत फिर्याद दाखल केली आहे. पोलीस तपासात इतर कोणाचा सहभाग असल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई केली जाणार आहे. मुखेकर यांनी परीक्षा विभागाच्या कामकाजाची माहिती वापरून गैरप्रकार केल्याचा संशय आहे. विद्यापीठाच्या गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रांमध्ये उच्च दर्जाची सुरक्षा वैशिष्ट्ये असल्याने अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहनही विद्यापीठाने केलं आहे.

विद्यार्थी आणि पालकांनी कोणत्याही बनावट कागदपत्रांच्या आमिषाला बळी न पडता अधिकृत प्रक्रियेवरच विश्वास ठेवावा, असं विद्यापीठानं स्पष्ट केलंय.

## शिर्डीत गुरुपौर्णिमा उत्सवात साईचरणी सोन्याची उधळण; दोन दिवसांत १ कोटी ७० लाखांचे सोने अर्पण

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी । प्रतिनिधी** : साईबाबांच्या शिर्डीत मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या तीन दिवसीय गुरुपौर्णिमा उत्सवाच्या (उलील इलीहग्स २०२६) मुख्य दिवशी साईबाबांच्या चरणी भक्तांकडून दानाची मोठी उधळण झाली. उत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांतच देशभरातील भाविकांनी साईबाबांच्या चरणी तब्बल १ कोटी ७० लाख रुपयांचे सोन्याचे दान गुरुदक्षिणा म्हणून अर्पण करण्यात आले. यामध्ये आकर्षक सोन्याचा हार, दोन सुवर्ण मुकुट आणि सुवर्ण 'ॐ' चिन्हांचा समावेश आहे. अशी माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

साईचरणी ३०० ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार अर्पण : गुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवशी मुंबईतील एका साईभक्ताने गुप्त दान करुन साईबाबांच्या चरणी ३०० ग्रॅम वजनाचा आकर्षक सोन्याचा हार अर्पण केलाय. या हाराची बाजारभावानुसार अंदाजे किंमत ४७ लाख रुपये आहे. दुपारच्या मध्यान्ह आरतीवेळी हा सुवर्णहार साईबाबांच्या मूर्तीस परिधान करण्यात आल्याची माहिती, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. संबंधित भक्ताने आपलं नाव गुप्त ठेवण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

साईचरणी एकूण १ कोटी ७० लाख रुपयांचे सोने अर्पण : उत्सवाच्या पहिल्या दिवशी विविध भक्तांकडून साईबाबांना तीन सुवर्ण वस्तू अर्पण करण्यात आल्या. आंध्र प्रदेशातील एका साईभक्ताने ६४२ ग्रॅम वजनाचा नक्षीदार सोन्याचा मुकुट अर्पण केला. या मुकुटाची किंमत सुमारे १ कोटी ३ लाख रुपये आहे. तसंच, मध्य प्रदेशातील जबलपूर येथील साईभक्त ए. के. शर्मा यांनी ४८ ग्रॅम वजनाचा नक्षीकाम असलेला सुवर्ण मुकुट अर्पण केला. या मुकुटाची किंमत ६ लाख २८ हजार ७५२ रुपये आहे. याशिवाय, गुजरातमधील वडोदरा येथील साईभक्त विजय बालकृष्ण नाईक यांनी २५.५३० ग्रॅम वजनाची दोन सुवर्ण 'ॐ' चिन्हे अर्पण केली. त्यांची किंमत ३ लाख ३४ हजार ४१७ रुपये आहे. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या पहिल्या दिवशी प्राप्त झालेले सुवर्ण अलंकार आणि दुसऱ्या दिवशी मुंबईतील भक्ताने अर्पण केलेला ३०० ग्रॅमचा सोन्याचा हार यांचा एकत्रित विचार करता, दोन दिवसांत साईबाबांच्या चरणी एकूण १ कोटी ७० लाख रुपयांचे सोने अर्पण झाले आहे.



देशभरातून लाखो भाविक शिर्डीत दाखल : गुरुपौर्णिमच्या निमित्ताने कालपासूनच शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. देशभरातून लाखो भाविक शिर्डीत दाखल झाले असून दर्शनानंतर प्रत्येक भक्त आपल्या श्रद्धेनुसार रोख रक्कम, सोने-चांदी आणि इतर वस्तू गुरुदक्षिणा म्हणून अर्पण करत आहेत. संपूर्ण मंदिर परिसर साईनामाच्या जयघोषाने आणि भक्तीरसाने दुमदुमून गेला असून, भाविकांच्या सोयीसुविधा आणि सुरक्षेसाठी संस्थानने चोख व्यवस्था केली आहे.

# जे केलं त्याचे परिणाम..., महिला आंदोलकाला कानाखाली मारणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यासंदर्भात हायकोर्टाचा मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था** : दिल्ली हायकोर्टाने अतिरिक्त पोलीस आयुक्त (ईशान्य) संदीप लांबा यांना हटवण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली आहे. दिल्लीतील जंतर मंतरवरील आंदोलनादरम्यान संदीप लांबा यांनी एका तरुणीच्या कानशिलात लगावल्याचं कॅमेऱ्याच कैद झालं होतं. यानंतर त्यांच्यावर कारवाईची मागणी केली जात होती. न्यायालयाने निरीक्षण नोंदवलं की, केवळ एखाद्या अधिकाऱ्यावरील आरोपांच्या आधारे योग्य कायदेशीर प्रक्रियेविना त्यांच्यात पूर्वग्रह असल्याचे गृहीत धरता येणार नाही. न्यायमूर्ती गिरीश काथपालिया यांनी तोंडी निरीक्षण नोंदवलं की, संबंधित अधिकाऱ्याने काही गैरप्रकार केल्यास त्यावर कायद्यानुसार कारवाई केली जाईलच, परंतु निष्पक्ष सुनावणीपूर्वीच त्यांना दोषी मानणे न्यायालयासाठी अयोग्य ठरेल.

''तुम्ही निष्पक्ष राहायला हवं. या संस्थेची विश्वासार्हता कमी करणं थांबवा. त्यांनी जे काही केलं असेल, त्याचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. पण याचा अर्थ असा नाही की, त्यांच्या प्रशासकीय देखरेखीखालील संपूर्ण कामच त्यांच्याकडून काढून घेतलं जावं,'' असे निरीक्षण न्यायाधीशांनी नोंदवलं.

'चलो जंतर-मंतर' आंदोलनादरम्यान लांबा यांनी एका तरुणीला कानाखाली मारल्याचा कथित व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर ही याचिका दाखल करण्यात आली होती. त्यांच्या प्रशासकीय देखरेखीखाली सुरू असलेल्या पोलीस चौकशीत पक्षपाताची शंका निर्माण झाली आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याने केला. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती कथपालिया यांनी विचारलं की, ''आज संपूर्ण दिल्ली पोलीसच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे आहेत का? मग त्यांनी एफआयआर नोंदवणे थांबवावे का?''

सुरुवातीलाच, दिल्ली पोलिसांच्या वतीने उपस्थित असलेल्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला माहिती दिली की, या प्रकरणाची चौकशी आधीच पूर्ण झाली आहे, याचिकाकर्त्याचा जबाब नोंदवण्यात आला आहे आणि पुढील कार्यवाहीसाठी अहवाल सक्षम प्राधिकरणाकडे पाठवण्यात आला आहे.

युक्तिवाद नोंदवून घेतल्यानंतर, याचिका निष्फळ ठरली आहे असे ठरवून न्यायालयाने ती फेटाळून लावली. हा आदेश लिहून दिल्यानंतरही, याचिकाकर्त्याच्या वकिलांनी लांबा यांच्याशी संबंधित नंतरच्या घडामोडींचा विचार करण्याची विनंती केली. त्यामुळे पक्षपाताच्या चिंतेत भर पडली आहे असा युक्तिवादही केला. तथापि, न्यायालयाने ही विनंती फेटाळली.




''आता केवळ ही व्यक्ती एका महिलेला कथितपणे थप्पड मारताना एका व्हिडिओ क्लिपमध्ये पकडली गेली आहे म्हणून, आपण त्याला बदनाम करू शकत नाही... जरी तो शेवटी दोषी आढळला तरी, तो प्रत्येक प्रकरणात अन्यायकारकपणे वागेल असं गृहीत धरता येईल का?'', असं निरीक्षण न्यायमूर्ती कथपालिया यांनी नोंदवलं.

न्यायाधीशांनी पुढे म्हटलं की, अशा कारणामुळे चौकशी हस्तांतरित करणे म्हणजे अधिकाऱ्याला खटल्याशिवाय दोषी ठरवण्यासारखेच होईल. ''जर मी या कारणास्तव चौकशी हस्तांतरित केली, तर मी त्यांची प्रतिमा मलीन करत नाही का? मी त्यांना खटल्याशिवाय दोषी ठरवत नाही का? एखादी व्यक्ती पक्षपाती आहे असे म्हणून तुम्ही नेमके आरोपच करत आहात. त्यांनाही निष्पक्ष सुनावणीचा हक्क आहे,'' असं न्यायमूर्तींनी सांगितलं.

याचिकाकर्त्याने पोलीस आयुक्तांकडे अशी मागणी केली होती की, लांबा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील ही चौकशी त्यांच्याकडून काढून घेण्यात यावी आणि ती ई ईशान्य दिल्लीबाहेर कार्यरत असलेल्या पोलीस उपायुक्तांकडे सोपवण्यात यावी.

